१५४ सांकेतांक क्र १९८६०१२९२२ ३८. क्र २३

परिपत्रक

क्रमांक कॉन/एल.आर. १२७/सी-१/८६
पुणे, दिनांक २९/१/१९८६.

उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व]

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
का. क. ३१[अ] अन्वये शुध्दीपत्रक व का. क. ३२[१] अन्वये दु. योजना कार्यपध्दती.

इकडील परिपत्रक क्रमांक सम दिनांक २१/४/८० चे पत्रकातील परिच्छेद २ब मध्ये का. क. ३१अ खालील करावयाच्या शुध्दीपत्रकाबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचना नुसार करण्यांत आलेल्या शुध्दीपत्रकापैकी एका प्रकरणी खातेदारांनी शुध्दीपत्रकाविरुध्द फेर तपासणी अर्ज शासनाकडे दाखल केला होता. त्या फेरतपासणी अर्जाच्या निकालपत्रकत शासनाने का. क. ३१अ खालील शुध्दीपत्रक कोणत्या परिस्थितीत करता येते याबाबत उहापोह केला आहे त्याबाबत शासनाच्या निर्णयाच्या प्रत माहितीसाठी यासोबत पाठविली आहे.

वरील निर्णयाच्या संदर्भात इकडील परिपत्रक क्रमांक कॉन एल.आर. १२७/सी-१/८५ दिनांक २१/४/८० मधील सूचनांचा फेर विचार करण्याची आवश्यकता असल्याने वरील परिपत्रकाच्या परिच्छेद २ब रद्द करुन त्याऐवजी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

[२ब] मुंबईचा तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ अन्वये योजनेचे मसुदे तयार करताना ज्या चुका मंजूर योजनेत आढळून येतील त्या हस्तदोषाच्या, गणिती चुका, किंवा नजर चुकीने झालेल्या असतील तर अशा चुकांच्या बाबतीत का. क. ३१ अ खाली शुध्दीपत्रक करता येईल. केवळ हस्तदोषामुळे वेरीज वजाबाकीच्या स्वरुपाच्या व दुसऱ्या कोणत्याच्या क्षेत्र आकारात व हक्कास बाध न आणणाऱ्या चुका दुरुस्त करण्यासाठीच फक्त शुध्दीपत्रक करण्यात यावे.

२] यापूर्वी झालेली सर्व शुध्दीपत्रके वरील संदर्भात पुनर्विलोकन करुन ज्या प्रकरणी अंमल झालेला नसेल तेथे दुरुस्ती प्रस्ताव सादर करावेत. या व्यतिरिक्त अन्य चुका योजना मसुद्यात असतील तर त्यांची दखल का. क. ३२ खाली दु. योजना जमाबंदी आयुक्त पुणे यांना सादर करुन घेणे इष्ट आहे.

सोबत सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे कार्यालयासाठी प्रति जोडल्या आहेत.

सही/-[सु. रामकृष्ण]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. रा.] पुणे.

प्रतिलिपी/- एकत्रीकरण अधिकारी [सर्व] यांचेकडे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे पाठव्या लागणाऱ्या प्रतीसह माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

" नि र्ग मि त"

सहाय्यक जमाबंदी आयुक्त [एकत्रीकरण]
पुणे.

प्रतिलिपी/- उपअधीक्षक भूमि अभिलेख क-१ ते ७ व अभिलेखापाल जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालय यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.